# प्रेस नोट दिनांक - १९/०७/२०१९

## भर गर्दीत महिलेचा पर्स मधील मोबाईल चोरी करणाऱ्या आरोपीस मुद्येमालासह युनिट-१, गुन्हे शाखेने केले जेरबंद.

---

यातील फिर्यादी नामे प्राजक्ता निखील सवालखे, रा डीएसके विश्व फ्लॅट नं १०६,धायरी पुणे यांचा मोबाईल व ५००/- रु तुळशीबेल बाग येथून पर्समधुन अज्ञात इसमाने दिनांक १२/०५/२०१९ रोजी चोरुन नेलेबाबत विश्रामबाग पो स्टे येथे गुरनं १८२/१९ भादविक ३७९ अन्वये गुन्हा दाखल असुन सदर गुन्हयाचा युनिट १ समांतर तपास करीत होते. युनिट-१ हद्दीमध्ये गुन्हयांना आळा घालण्याचे दृष्टीने पोलीस कर्मचारी खाजगी वाहनाने पेट्रोलींग करीत असताना पो. ना. इम्रान शेख यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, इसम नामे जमीर आत्तार हा चोरीचा मोबाईल फोन विकण्यासाठी आलेला असून तो जुना मोटर स्टँड,भवानी पेठ पुणे येथे कटटयावर बसलेला असून त्याचे वर्णन सांगीतलेने, सदरची बातमी वरिष्ठांना कळविली. त्यांनी खात्री करून कारवाई करणेबाबत सुचना दिल्या.

सदर ठिकाणी स्टाफसह जावून खात्री होताच सदर इसमास ताब्यात घेतले. त्यास नाव पत्ता विचारता त्याने त्याचा नाव व पत्ता जमीर ऊर्फ सलमान सलीम आत्तार वय ३० वर्ष रा मोरे यांचे घर,जुना मोटर स्टँड, भारत टॉकिजजवळ, भवानी पेठ पुणे असे असल्याचे सांगितले. त्यास विश्वासात घेवून तपास करता त्याने सुमारे दोन महिन्यापुर्वी तुळशीबेल बागेत एका महिलेच्या खांदयावर अडकविलेल्या पर्समधील मोबाईल हा तिचे न कळत चोरला असून तो मोबाईल थोडया दिवसांपुर्वी त्याने स्वतः वापरला असल्याचे सांगितलेने सदर विवो कंपनीचा काळया रंगाची बॉडी असलेला मोबाईल कि.रु. १८,०००/- असून सदर बाबत विश्रामबाग पो स्टे येथे खात्री करता तेथे गुरनं १८२/१९ भादविक ३७९ अन्वये गुन्हा दाखल असल्याची माहिती मिळालेने सदर आरोपीस पुढील तपासकामी विश्रामबाग पोलीस ठाणेचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई ही श्री.अशोक मोराळे सो., अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री.शिरीष सरदेशपांडे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, श्री.समिर शेख, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१ यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.अरुण वायकर, पोलीस हवा. योगेश जगताप, इमरान शेख, सपोफौज. बाबा चव्हाण, पो.हवा. रिजवान जिनेडी, श्रीकांत वाघवले, तुषार खडके, इरफान मोमिन, यांनी केली आहे.

## प्रेस नोट दिनांक - १९/०७/२०१९

## युनिट १, गुन्हे शाखेकडून अवैध धंदयावर कायदेशीर कारवाई

---

दि. १८/७/२०१९ रोजी वरिष्ठांकडून अवैध धंदयांवर कारवाई करणेसाठी आदेशीत असलेने फरासखाना पोलीस ठाणेचे अंतर्गत युनिट १ कडील अधिकारी व कर्मचारी पेट्रोलींग फिरत असतांना त्वाष्टाकासार मंडळ, कसबापेठ, पुणे येथील इमारतीच्या जिन्यालगत अवैधरीत्या क्लब चालू असलेबाबत समजले होते व सदर ठिकाणी जावून कायदेशीर कारवाई करणेकामी सुचना मिळाल्या होत्या.

सदर ठिकाणी स्टाफसह जावून खात्री करता, इमारतीच्या जिन्या शेजारी मोकळया जागेत कापडी पडदा लावून ५ ते ६ इसम खाली गोलाकार बसून पत्त्यांचा जुगार खेळत असलेबाबत दिसले. सदर ठिकाणी आमची व पंचांची खात्री होताच अचानक छापा टाकून ६ इसमांना जागीच ताब्यात घेवून त्यांचे नांव पत्ता विचारता, त्यांची नावे १) सुशांत निजामपूरकर, रा. कसबा पेठ, पुणे २) अब्दुल अन्सारी, रा. लमाएावस्ती, येरवडा, ३) सेवा पंडीत, रा. येरवडा, पुणे ४) यणूल अन्सारी, रा. लमाणवस्ती, येरवडा, पुणे, ५) वैजनाथ पंडीत, सादलबाबा जवळ, येरवडा, पुणे ६) परमेश्वर पंडीत, डेक्कन कॉलेज ग्राउाड जवळ, येरवडा, पुणे असी असलेचे सांगीतले.

त्यांना ताब्यात घेवून त्यांचे ताब्यातून १२,८००/- रु.चा मुछ्देमाल जप्त करण्यात आला असून त्यांचे विरुध्द फरासखाना पोलीस ठोणे येथे गुन्हा रजि.नं.२१५/१९ जुगार ॲक्ट कलम १२(अ) प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

सदरची कारवाई ही श्री.अशोक मोराळे साो., अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री.शिरीष सरदेशपांडे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, श्री.समिर शेख, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१ यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.अरुण वायकर, पोलीस उप निरी. दिनेश पाटील, पो.हवा. अजय थोरात, अशोक माने, पो.ना. सुभाष पिंगळे, अमोल पवार, वैभव स्वामी, तुषार माळवदकर, बाबा चव्हाण यांनी केली आहे.

## प्रेसनोट दि. १९/०७/२०१९

### सी - वॉच या महत्वकांक्षी प्रकल्पातंर्गत लक्ष्मी रोड परिसरातील कापड व्यापारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची व वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची बैठक

पुणे शहर पोलीस आयुक्त यांच्या संकल्पनेतून सी-वॉच सीसीटीव्ही सर्व्हेलन्स हा महत्वाकांक्षी प्रकल्प पुणे शहरात राबविण्यात येत आहे. पुणे शहरात प्रमुख रस्त्यांवरील वेगवेगळ्या चौकांमध्ये शासनामार्फत सन २०१५ पासुन १३२० सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले आहे. सदर कॅमेऱ्यांची मर्यादीत संख्या व त्याद्वारे होणारे चित्रीकरण विचारात घेता, पुणे शहरामध्ये गुन्हे प्रतिबंध व प्रकटीकरण करण्यासाठी मोठ्या प्रमाणात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची आवश्यकता आहे.

पुणे शहरातील नागरिकांची सुरक्षीतता तसेच कायदा व सुव्यवस्था ही बाब विचारात घेवुन शहरातील विविध विभागातील सार्वजनिक रस्ते, सार्वजनिक जागा, यावर घडणाऱ्या गुन्हेगारी हालचालींचे निगराणीसाठी यासाठी पुणे शहर परिसरात सध्या उपलब्ध असलेल्या खाजगी सीसीटीव्ही कॅमेरे व लोकसहभागातुन नागरिकांचे मदतीने संस्था, प्रतिष्ठाण इत्यादींचे प्रबोधन करुन खाजगी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची संख्या वाढवुन संपुर्ण शहरामध्ये सीसीटीव्हीचे व्यापक जाळे निर्माण करणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे.

सी-वॉच सीसीटीव्ही सर्व्हेलन्स या प्रकल्पाचे अनुषंगाने आज दि. १९/०७/२०१९ रोजी अपर पोलीस आयुक्त गुन्हे श्री अशोक मोराळे व पोलीस उप-आयुक्त परिमंडळ १ श्रीमती स्वप्ना गोरे यांच्या अध्यक्षतेखाली लक्ष्मी रोड परिसरातील कापड व्यापारी संघटनेचे पदाधिकाऱ्यांची व सदस्यांची पोलीस उप-आयुक्त परिमंडळ १ यांच्या कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठकीस ३०-४० लक्ष्मी रोड परिसरातील कापड व्यापारी संघटनेचे पदाधिकारी व सदस्य हजर होते. त्यांना सी-वॉच प्रकल्पाची माहिती देवून त्यांचे दुकानांसमोरील मुख्य रस्ता / सार्वजनिक जागा याचे सुस्पष्ट चित्रीकरण होईल अशा रितीने कॅमेरे बसविण्याचे आवाहन करण्यात आले. त्यास व्यापाऱ्यांचाही सकारात्मक प्रतिसाद मिळाला असून माहे ऑगस्ट अखेर पर्यंत दुकानासमोरील मुख्य रस्त्याचे / सार्वजनिक जागा याचे चित्रीकरण अशा रितीने कॅमेरे बसवून घेण्याचे आश्वासन दिल्याने माहे ऑगस्ट अखेर पर्यंत संपुर्ण लक्ष्मी रस्ता हा सीसीटीव्ही सर्व्हेलन्सच्या कक्षेत येईल.